महत्त्वाचे

ना. विखे पाटील व आ. लंघे यांचे शेतकऱ्यांनी मानले आभार

बालाजी देडगाव (वार्ताहर)– लवकरात लवकर मुळा धरणाच्या आवर्तनाबाबत नियोजन बैठक घेवून, आवर्तन सोडण्याचे आदेश दिल्याने ना. राधाकृष्ण विखे पाटील, आ. विठ्ठलराव लंघे यांना शेतकऱ्यांनी धन्यवाद दिले. राष्ट्रवादीचे अब्दुल शेख आणि भाजप नेते नितीन दिनकर, राष्ट्रवादीचे पदाधिकारी यांनी पाटपाणी संदर्भात आमदार विठ्ठलराव लंघे यांची भेट घेत, हा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली होती. नेवासा तालुक्यात कांदा लागवड, ऊस, ज्वारी यासाठी पाण्याची टंचाई निर्माण झाली होती. त्यामुळे शेतकरी अडचणीत आले होते. याबाबत तालुक्यातील शेतकऱ्यांनी राष्ट्रवादीचे अब्दुल शेख यांची भेट घेऊन त्यांना याबाबत कल्पना दिली होती. नागपूर येथे अधिवेशनास उपस्थित झाल्यावर अब्दुल शेख यांनी मुळा धरणातून आवर्तन सोडण्यात यावे, अशी मागणी आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांना केली. त्यांनी तात्काळ मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन त्यांना पाटपाणी सोडण्याची मागणी केली. मंत्री विखे पाटील यांनी संबधित अधिकारी सायली पाटील यांच्याशी संपर्क करत लवकरात लवकर नियोजन बैठक घेत पाटपाणी सोडण्याचे आदेश दिले. मंत्री विखे पाटील व आमदार विठ्ठलराव लंघे यांनी शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर तोडगा काढल्याने अब्दुल शेख, नितीन दिनकर व राष्ट्रवादी पदाधिकाऱ्यांनी त्यांचे आभार मानले. याप्रसंगी मकरंद राजहंस, अशोक मोरे, सतिश कावरे, अभिराज आरगडे, अशपाक शेख आदी उपस्थित होते.

एकविरा फाऊंडेशनकडून पाच विद्यार्थिनींना सायकल प्रदान

तळेगाव दिघे (वार्ताहर– महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित संगमनेर तालुक्यातील तळेगाव दिघे येथील शिक्षणमहर्षी गुलाबराव गोविंदराव जोंधळे माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या पारेगाव खुर्द येथील पाच गरजू आणि गरीब विद्यार्थिनींना एकविरा फाउंडेशन तर्फे मोफत सायकल प्रदान करण्यात आल्या. एकविराच्या अध्यक्षा डॉ. जयश्री थोरात यांच्या हस्ते संगमनेर येथे शिक्षणमहर्षी विद्यालयातील प्राची किरण मोकळ (सातवी), समीक्षा मिलिंद मोकळ (सातवी), श्रेया अरुण बागुल (सातवी), तेजल गोरख हलवर (पाचवी), ईश्वरी शिवनाथ मोकळ (पाचवी) या विद्यार्थिनींना मोफत सायकल प्रदान करण्यात आल्या. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सखाराम शेरमाळे, सुनील मोकळ, मिलिंद मोकळ, अण्णासाहेब कांदळकर, किरण मोकळ यांसह पदाधिकारी व पालक उपस्थित होते. सदर पाचही विद्यार्थिनी पारेगाव खुर्द येथून तळेगाव दिघे येथे शिक्षणासाठी दररोज पायी येत होत्या. एकविरा फाउंडेशनतर्फे पाचही विद्यार्थिनींना सायकल मिळाल्याने त्यांची गैरसोय दूर झाली आहे, असे प्राचार्य एच. आर. दिघे यांनी सांगितले.

पालिकेच्या अनागोंदी कारभाराला शिस्त लावण्याचे मुख्याधिकाऱ्यांपुढे आव्हान

कर्मचाऱ्यांतील आपसी गटबाजीचा प्रशासनावर विपरीत परिणाम

श्रीरामपूर (प्रतिनिधी)– एकेकाळी नावाजलेल्या श्रीरामपूर नगरपालिकेच्या कारभाराला आता ओहोटी लागली असून कर्मचाऱ्यांतील आपसी गटबाजीमुळे शहरातील समस्यांमध्ये वाढ झाली आहे. या गटबाजीला लगाम लावून पालिकेचा कारभार लोकाभिमुख करण्याचे आव्हान नव्याने आलेले मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांच्यापुढे उभे ठाकले आहे.

पालिकेत प्रशासकीय राजवट येऊन आता जवळपास दोन वर्षे होत आली आहे. मालेगाव महानगरपालिकेचे विद्यमान उपायुक्त व श्रीरामपूर नगरपालिकेचे माजी मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी त्यांच्या काळामध्ये पालिकेच्या कारभाराला शिस्त लावायचा प्रयत्न केला. परंतू त्यांच्यानंतर मुख्याधिकारी म्हणून आलेले जाधव यांच्या काळात पालिकेत कर्मचाऱ्यांमध्ये उघड दोन गट पडले. पालिकेत कारभाराऐवजी कुरघोड्या करण्यातच वेळ जात असल्याने शहरांमध्ये पालिकेच्या विविध विभागातील अनेक प्रश्न निर्माण झाले.

अल्पावधीत जाधव यांची फैजपूर येथे बदली झाल्याने त्यांचे जागेवर दोन महिन्यापूर्वी मच्छिंद्र घोलप हे मुख्याधिकारी म्हणून रुजू झाले आणि लगेच विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागली. आचारसंहिता काळामध्ये नगरपालिकेचे कामकाज जवळपास ठप्प झाल्यासारखे होते. आता आचारसंहिता उठल्यानंतर मुख्याधिकाऱ्यांनी पालिकेचा कारभार लोकाभिमुख करण्यासाठी पावले उचलली असून प्रत्येक विभागाचा लेखाजोखा घेण्यास सुरुवात केली आहे.

शहरातील नागरिक आपल्या समस्या घेऊन मुख्याधिकाऱ्यांना भेटत आहेत. नागरी समस्यांचा डोंगर पाहून मुख्याधिकारी घोलप देखील चक्रावून गेले आहेत. त्यांनी यापूर्वी पाच ते सहा ठिकाणी मुख्याधिकारी म्हणून कामकाज केले असल्याने त्यांना प्रशासनाचा दांडगा अनुभव आहे. त्यामुळे कर्मचारी काय करतात आणि नागरिक काय बोलतात याकडे त्यांचे बारीक लक्ष आहे.

पालिकेचा आरोग्य विभाग सध्या सलाईनवर काम करतोय. शहरातील स्वच्छतेसाठी पालिकेने ठेकेदार नेमलेला आहे. दरमहा मोठी रक्कम देऊन हा ठेका त्याला दिलेला आहे. मात्र, त्याने नेमलेले पर्यवेक्षक आणि इतर यंत्रणा अनेक भागांमध्ये फारसे काळजीपूर्वक काम करीत नाही असे दिसून येते. माजी नगरसेवक संजय छल्लारे यांनी शहरातील समस्यांसाठी निर्माण केलेल्या 'आरोग्य सेवा' या सोशल मीडिया ग्रुप वर दररोज प्रत्येक भागातील नागरिक आपल्या समस्या टाकतात. जी कामे नियमितपणे न सांगता झाली पाहिजे ती वारंवार सांगूनही होत नाही असा नागरिकांचा अनुभव आहे.त्यामुळे आरोग्य विभागामध्ये मोठे 'ऑपरेशन' करण्याची आवश्यकता आहे. नागरिकांनी तक्रार केल्याशिवाय अनेक भागात कचरा उचलला जात नाही. रस्त्याची साफ-सफाई होत नाही.औषध फवारणी होत नाही. आरोग्य विभागातील पालिकेचे नियमित कर्मचारी व ठेकेदाराचे कर्मचारी नेमके काय काम करतात याचा नव्याने आढावा घेण्याची गरज आता निर्माण झाली आहे.

बांधकाम खात्याची तऱ्हा तर खूपच निराळी आहे. पावसाळ्यानंतर शहरातील अनेक भागातील रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले आहेत. ते खड्डे दुरुस्तीचे काम करण्याकडे बांधकाम विभागाचे दुर्लक्ष आहे. शहरातील मुख्य रस्त्यावर खड्डे बुजविण्याचे काम आता सुरू झालेले असले तरी उपनगरातील अनेक रस्त्यांवर मोठे खड्डे आहेत. तेथून जाणाऱ्या येणाऱ्यांना खूप त्रास होतो. दुचाकी चार चाकी गाड्यांची संख्या वाढली. मात्र, रस्ते लहान झाले आहेत. त्यामुळे हे खड्डे अनेकांना तापदायक ठरत आहेत. या खड्ड्यांमुळे शहरात पाठीचे आजाराचे रुग्ण वाढल्याचे दिसून येत आहे. पाणीपुरवठा विभाग हा अलीकडे मोठा चर्चेचा विषय ठरला आहे. पंधरा दिवसांपूर्वी कालव्याचे रोटेशन लांबल्याने शहराला पाणीपुरवठ्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला होता. त्या काळात लोकांना अक्षरशः दुर्गंधीयुक्त पाणी प्यावे लागले. शहरात अनेक भागांमध्ये गटारीच्या खाली पाईपलाईन असल्याने व लिकेजमधून गटारीचे पाणी पाईपलाईनमध्ये जात असल्याने अनेक भागांमध्ये आजही अस्वच्छ पाणी येते. याबाबत तक्रारी करूनही फारशी दखल घेतली जात नाही.नेहरूनगर भागातील मुख्य जलवाहिनीवर एक वॉल लिकेज असल्याने गेली सहा महिन्यापासून तेथे रोज मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात आहे. शहरामध्ये मोठ्या प्रमाणात बेकायदा नळ जोडण्याची संख्या वाढली आहे कुणीही येतो आणि नळ जोडून घेतो अशी परिस्थिती आहे. याकडे मुख्याधिकाऱ्यांना लक्ष द्यावे लागणार आहे. शहरातील उद्यानांची दुरावस्था झाली आहे. बाजार तळाजवळील उद्यान तर नामशेष झाले आहे. पालिकेच्या दवाखान्यात वेळेवर औषध पुरवठा होत नसल्याने रुग्णांच्या तक्रारी वाढल्या आहेत. नगरपालिका शिक्षण मंडळातील प्रश्न देखील प्रलंबित आहेत. मुख्याध्यापक नेमणुकांचे प्रस्ताव शिक्षण अधिकाऱ्यांकडे गेलेले नाहीत. तसेच निवड श्रेणी व पदवीधर श्रेणीचे प्रश्न देखील प्रलंबित आहेत. अशा विविध प्रश्नांग्रस्त झालेल्या नगरपालिकेच्या कारभाराला योग्य शिस्त लावून नागरिकांना चांगली सेवा देण्याचे आव्हान पालिकेचे मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांच्यापुढे आहे. त्यांचा कामाचा अनुभव पहाता ते हे प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावतील, अशी अपेक्षा श्रीरामपूरकरांना आहे.

सर्व अतिक्रमणे निघणार का?

- शहरामध्ये सर्वच भागात अतिक्रमणांमध्ये मोठी वाढ झाली आहे. मुख्य रस्त्यांवर देखील अतिक्रमणे वाढल्याने दुकानदार सुद्धा वैतागले आहेत. आचारसंहितेपूर्वी मागील मुख्याधिकाऱ्यांनी अतिक्रमण विरोधी मोहीम आखली होती. मात्र, भाजपचे नेते मंडळींनी त्यांची भेट घेऊन या मोहिमेला 'ब्रेक' दिला होता. आता निवडणूक झालेली असल्याने ही मोहिम सुरु झाली असली तरी सर्व अतिक्रमणे निघणार का? असा प्रश्न विचारला जात आहे.

विद्यार्थ्यांनी ध्येयासक्त बनावे- दांगट

वांबोरी येथील महेश मुनोत विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

उंबरे (वार्ताहर)– नम्रता, चिकाटी व कष्ट ही विद्यार्थ्यांची महत्त्वाची बिरुदे आहेत, विद्यार्थ्यांनी जीवनात प्रामाणिकपणा व सचोटी ठेवून आपले ध्येय गाठावे. ध्येयसक्त जर विद्यार्थी बनला तर त्याचे जीवन सुखकर होईल' असे प्रतिपादन मुंबईचे राज्य कर उपायुक्त दीपक दांगट यांनी केले.

राहुरी तालुक्यातील वांबोरी येथील अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या महेश मुनोत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलन व पारितोषिक वितरण समारंभाप्रसंगी ते बोलत होते. ते म्हणाले, या विद्यालयाचा माजी विद्यार्थी असल्याचा मला सार्थ अभिमान आहे. आपले ध्येय गाठण्यासाठी आपण नेहमी प्रयत्नशील राहिले पाहिजे. विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती सदैव आदरभाव व निष्ठा ठेवून जीवनाचे ध्येय गाठावे. सध्याच्या शैक्षणिक वातावरणात खूपच बदल झालेला दिसून येत आहे. सोशल मीडिया हा एक माहिती मिळवण्याचा खुला स्रोत आहे. विद्यार्थ्यांनी एका विशिष्ट चौकटीत अडकून न राहता वेगवेगळ्या क्षेत्रांचे अवलोकन करून त्याकडे मार्गक्रमण करावे.

कार्यक्रमाची सुरुवात सरस्वतीपूजन व दीपप्रज्वलनाने मान्यवरांच्या हस्ते झाली. प्रमुख अतिथींचा परिचय क्रीडा अध्यापक बी.एम.पटारे यांनी करून दिला. अहवाल वाचन प्राचार्या सुवर्णा वैद्य यांनी केले.

माजी प्राचार्य शामराव पटारे म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेवर विश्वास ठेवावा व आपले नाणे खणखणीत असावे तसेच विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रती कृतज्ञता ठेवावी.

यावेळी लोकगीते, योगासने विविध प्रकारचे नृत्याविष्कार विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्साहात सादर केले. विज्ञान, चित्रकला, हस्तकला, रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. शाळा समितीचे को-चेअरमन हेमंत मुथा, प्रमुख अतिथी दीपक दांगट व इतर मान्यवरांच्या हस्ते विविध स्पर्धांत सुयश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. प्रमुख अतिथींचा हेमंत मुथा यांच्या हस्ते करण्यात आला. आदर्श विद्यार्थी रोहन शिंदे व कीर्ती पटारे यांचा मुथा परिवाराच्यावतीने खास ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला.

स्नेहसंमेलनास शाळा समितीचे को-चेअरमन हेमंत मुथा, शाळा समिती सदस्य अनुज पंचारिया, सुरेखा पटारे, प्रशालेच्या उपप्राचार्य वनिता बोऱ्हाडे, चंद्रकांत पंडित, पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा ज्योती कुसमुडे, रेश्मा आतार, अमोल जाधव, सुधाकर वाबळे, शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे यादीवाचन बाळासाहेब नवले यांनी केले. सूत्रसंचालन हर्षल कुलकर्णी यांनी तर आभार संजय विटनोर यांनी मानले.

द्रोणा अकॅडमीची इमॅजिका येथील आनंददायी सहल

राहाता (तालुका प्रतिनिधी)– राहाता तालुक्यातील साकुरी येथील द्रोणा अकॅडमीची इमॅजिका येथील सहल उत्साहात पार पडली.

संस्थेचे कार्यकारी विश्वस्त जयराज दंडवते, संचालिका प्राजक्ताताई दंडवते, संचालक अनुप दंडवते, प्राचार्या अनिता रोहोम यांनी विद्यार्थ्यांना या सहलीसाठी शुभेच्छा दिल्या होत्या. सहलीच्या शुभारंभाच्या वेळी साईबाबा व छत्रपती शिवाजी महाराज यांचा गजर विद्यार्थ्यांनी केला. जयराज दंडवते म्हणाले, विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक ज्ञानाव्यतिरिक्त बाहेरील ज्ञान आत्मसात करण्यासाठी दरवर्षी अशा शैक्षणिक सहलीचे आयोजन केले जाते. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सुप्तगुणांना वाव मिळतो व बाहेरील माहिती विद्यार्थ्यांना मिळते. विद्यार्थ्यांनी त्या ठिकाणी इमॅजिका वॉटर पार्क, महाडमधील गणपती, गगनगिरी महाराज आश्रम, मॅनटरिया रिसॉर्ट या ठिकाणी विद्यार्थ्यांनी भेट दिली व त्या ठिकाणची माहिती जाणून घेतली. त्याचबरोबर त्या ठिकाणी विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद घेतला. सहलीबरोबरच द्रोणा स्कूल व कॉलेजमध्ये असे विविध उपक्रम राबवले जातात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आगमन दिन उत्साहात

श्रीरामपूर (प्रतिनिधी)– भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर दि.१६ डिसेंबर १९३९ रोजी बेलापूर स्टेशनला आले होते. रेल्वे स्टेशनवर उतरून हरेगाव येथे महार वतन परिषदेत ते उपस्थित राहिले. या ऐतिहासिक दिनाला ८५ वर्षे पूर्ण झाल्याने, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पूर्णाकृती पुतळा स्मारक समितीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर आगमन दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

यानिमित्ताने बेलापूर रेल्वे स्टेशनसमोर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा लावण्यात आली होती. त्या प्रतिमेस भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष बाबासाहेबांचे नातू भीमराव आंबेडकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यावेळी रेल्वे स्टेशनचे स्टेशन प्रबंधक एम.पी. पांडे यांना बाबासाहेब रेल्वे स्टेशनवर आल्याची प्रतिमा भीमराव आंबेडकर व समितीचे अध्यक्ष सुभाष त्रिभूवन, भारतीय बौद्ध महासभेचे गौतम पगारे, सुगंधराव इंगळे, सरिता सावंत यांच्या हस्ते देण्यात आली. त्यावेळी रिपाईचे राजू गायकवाड, वंचितचे चरण त्रिभूवन, सुनील शिरसाठ, सुरेश जगताप, संजय रूपटक्के, रितेश एडके, अशोक लोंढे, वसंत साळवे, गोरख आढाव, सुरेश शिवलकर, विश्वास भोसले, वंचितचे किशोर ठोकळ, प्रवीण साळवे, नवनाथ गुडेकर, दर्शनाताई काळे, संगीताताई गायकवाड, जयश्री पवार, वंदनाताई गायकवाड आदी उपस्थित होते. बेलापूर रेल्वे स्टेशन तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक या ठिकाणी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळा स्मारक समितीच्या वतीने विद्युत रोषणाई करून साऊंड सिस्टिम लावून महामानवाच्या आगमन दिनाचा जल्लोष करण्यात आला.

हिंद सेवा मंडळ सेवकांची सहकारी पतपेढीचा पुरस्कार वितरण सोहळा

हिंद सेवा मंडळाच्या सेवकांची सहकारी पतपेढीचा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न. (छाया– अमोल कदम)

श्रीरामपूर (प्रतिनिधी)– हिंद सेवा मंडळाच्या सेवकांची सहकारी पतपेढीच्या वतीने सभासदांच्या पाल्यांनी सन २०२३-२४ मध्ये मिळविलेल्या शैक्षणिक यशाबद्दल तसेच सभासदांनी मिळविलेल्या स्पृहणीय यशाबद्दल पुरस्कार वितरण व गुणगौरव सोहळा दादा वामन जोशी नवीन मराठी शाळा, श्रीरामपूर येथे संपन्न झाला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पतपेढीचे अध्यक्ष दीपक आरडे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंद सेवा मंडळाचे सहसचिव रणजीत श्रीगोड होते. त्यांनी पतपेढीच्या उज्वल यशामागे सभासद व संचालक यांचा महत्वाचा वाटा असल्याचे सांगितले. याप्रसंगी क. जे. सोमैय्या हायस्कुलचे चेअरमन संजय छल्लारे, भि.रा. खटोड कन्या विद्यालयाचे चेअरमन दत्तात्रय साबळे, डॉ. वा. ग. कल्याणकर रात्र प्रशालेचे चेअरमन चंद्रकांत सगम, दा. वा. जोशी नवीन मराठी शाळा बालवाडी विभागाचे चेअरमन सुशील गांधी, स्कूल कमिटी सदस्य गोरख बारहाते, दत्तात्रय काशिद, शां. ज. पाटणी विद्यालयाचे मुख्याध्यापक विठ्ठल भांगरे आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला. तसेच सेवानिवृत्त सभासद सुनिता मकासरे, उज्ज्वला कुलकर्णी, प्रमिला मेमाणे, चेतनकुमार वाजे, विजयकुमार आगलावे, चंदिका पाठक व विद्या कुलकर्णी यांना शाल, पुष्पगुच्छ व चांदीचे नाणे देवून गौरविण्यात आले. सूत्रसंचालन पतपेढीच्या उपाध्यक्षा स्मिता पुजारी व निर्मला लांडगे यांनी केले. बक्षिस यादीचे वाचन पतपेढीचे माजी अध्यक्ष अधिक जोशी यांनी केले. पतपेढीचे संचालक मधुकर पवार, नितीन केणे, दीपक शिरसाठ, वैशाली दारवेकर, तज्ज्ञ संचालक नवनाथ जंगले, महादेव राऊत, पतपेढीचे सचिव किशोर कुलकर्णी व सेवकवर्ग यांनी कार्यकमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले. याप्रसंगी पतपेढीचे सभासद व त्यांचे पाल्य उपस्थित होते. पतपेढीचे संचालक सतिश म्हसे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

श्रीरामपूर वासियांच्यावतीने राधाकृष्ण विखेंचा नागपूरला सन्मान

श्रीरामपूर (प्रतिनिधी)– नुकत्याच झालेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नवीन मंत्रीमंडळात भाजपचे ज्येष्ठ नेते राधाकृष्ण विखे पाटील यांची पुन्हा कॅबिनेट मंत्रीपदी वर्णी लागल्याने त्यांचा श्रीरामपूर तालुक्याच्या वतीने नागपूर येथे सन्मान करण्यात आला.

बेलापूर खुर्दचे सरपंच ॲड. दिपक बारहाते, अहिल्यानगर जिल्हा ग्राम महसूल अधिकारी संघटनेचे उपाध्यक्ष बाबासाहेब कदम, कृषी उद्योजक प्रतिनिधी बाळासाहेब भवार, अमोल बोंबले आदी यावेळी उपस्थित होते.

परभणीप्रकरणी नेवासा बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद

नेवासाफाटा (वार्ताहर)– परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी या युवकाचा न्यायालयीन कोठडीत असताना मृत्यू झाल्याप्रकरणी रिपाइंच्या वतीने नेवासा शहरासह नेवासा फाटा बंदची हाक दिली होती. व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने आपापली दुकाने बंद ठेवून त्याला पाठिंबा दिला.

यावेळी परभणी येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळील संविधान प्रतिमेची विटंबना करणाऱ्या समाजकंटकासह इतर गुन्हेगारांवर देशद्रोहाच्या गुन्ह्यात अटक करून सोमनाथ सूर्यवंशी याच्या मारेकऱ्यास तत्काळ अटक करून, खुनाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी रिपाईचे तालुकाध्यक्ष सुशिल धायजे यांनी केली.

यावेळी रिपाइंच्या वतीने नेवासा पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले. या निवेदनात म्हंटले आहे की, काही दिवसांपूर्वी परभणी येथे झालेल्या संविधानाच्या विटंबना घटनेचा निषेध आंदोलनानंतर पोलिसांकडून आंदोलकांना बेदम मारहाण करण्यात आली होती. या आंदोलनात नसलेला आणि कायद्याचे शिक्षण घेणारा विद्यार्थी भीमसैनिक सोमनाथ सुर्यवंशी याचा पोलीस कोठडीत मृत्यू झाला असून या प्रकरणाची वरिष्ठ पातळीवरुन सखोल चौकशी करण्यात यावी, तसेच याप्रकरणी न्यायालयीन चौकशी करुन मारहाण करणारे जे काही पोलीस जबाबदार असतील त्यांची तत्काळ नोकरीतून हकालपट्टी करावी, तसेच सूर्यवंशी यांच्या मृत्यूप्रकरणी मारहाण करणाऱ्या पोलिसांवर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी यावेळी आंदोलकांनी केली. याप्रसंगी नेवासा तालुकाध्यक्ष सुशिल धायजे, शहराध्यक्ष पप्पू इंगळे, संजय सुखदान, रिपाईचे जिल्हा सरचिटणीस संजय बनसोडे, शांतवन खंडागळे, तालुका कार्याध्यक्ष नितीन भालेराव, स्वप्निल सोनकांबळे, सनी पाटोळे यांच्यासह भिमसैनिक मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले होते.